मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महिला बचत गटाच्या माध्यमातून चालणार शून्य कचरा प्रकल्प

## दापोडीमध्ये शून्य कचरा प्रकल्प : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते उद्घाटन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्पाचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते आज उद्घाटन करण्यात आले. महिला बचत गटामार्फत चालवल्या जाणाऱ्या या प्रकल्पात घरगुती कचऱ्यापासून खत निर्मिती करण्यात येते.

महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत दापोडी येथे शून्य कचरा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन आयुक्त सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपायुक्त सचिन पवार, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, सहायक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, सीवायडीए सामाजिक संस्थेचे संस्थापक मॅथ्यू मॅथम, कार्यकारी संचालक प्रवीण जाधव, अकर सोल्युशन्सचे उपाध्यक्ष दिलीप गाडा आदी उपस्थित होते.



आयुक्त सिंह यांनी यावेळी प्रकल्पातील विविध उपक्रमांचा आढावा घेतला. घनकचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कशा पद्धतीने करण्यात येत आहे, याबाबत माहिती घेतली. प्रकल्पस्थळी कार्यरत बचतगटांच्या महिलांशी संवाद साधून त्यांच्या कामाची प्रशंसा केली. यावेळी ते म्हणाले, दापोडी परिसरात सुरु असलेला शून्य कचरा प्रकल्प हा पर्यावरणपूरक आणि शाश्वत नागरी स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. घरगुती कचऱ्याचे संकलन केल्यानंतर तो वर्गीकृत करून त्याद्वारे खत निर्मिती करण्याची प्रक्रिया करण्याचे काम करणाऱ्या महिलांची आरोग्याची काळजी येथे व्यवस्थित घेतली जात आहे. या महिलांना आरोग्याच्या दृष्टिने आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, असेही आयुक्त सिंह म्हणाले.

शून्य कचरा प्रकल्पामध्ये स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढवण्यावरही भर देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही आयुक्त सिंह यांनी यावेळी दिले. उपायुक्त सचिन पवार यांनी आयुक्त सिंह यांना शून्य कचरा प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती दिली.

### असा आहे प्रकल्प

» पिंपरी चिंचवड महापालिकेने सीवायडीए संस्था आणि अकर सोल्युशन यांच्या सहकार्याने दापोडी येथील आनंदवन व काटेवस्ती येथे शून्य कचरा प्रकल्प सुरू केला आहे. वैष्णवी महिला बचत गटाच्या माध्यमातून हा प्रकल्प चालवला जातो. या प्रकल्पांसाठी दररोज ४२८ घरातील कचऱ्याचे संकलन करून त्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करण्यात येते. त्यानंतर धूळ झटकण्याची मशीन, ॲग्लोमीटर मशीन, हायड्रॉलिक प्रेस मशीन, सेमी ऑटोमॅटिक खत मशीन आदींच्या मदतीने कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याद्वारे खत निर्मिती करण्यात येते.

> “ दापोडी परिसरात सुरु असलेला शून्य कचरा प्रकल्प हा पर्यावरणपूरक आणि शाश्वत नागरी स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. स्वच्छ, सुंदर पिंपरी चिंचवड शहरासाठी येत्या काळात असे विविध प्रकल्प राबवण्याचे नियोजन आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.

---

# हभप दत्तात्रय कुदळे यांना पिंपरी-चिंचवड समाजभूषण पुरस्कार जाहीर

## दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील प्रतिष्ठानतर्फे शुक्रवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या 39 व्या स्मृतीदिनानिमित्त पिंपरी-चिंचवड समाजभूषण पुरस्कार ह.भ.प. दत्तात्रय कुदळे यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा तसेच, रक्तदान शिबिर शुक्रवार (दि.6) पिंपरी वाघेरे येथील नवमहाराष्ट्र विद्यालय मैदान येथे सकाळी 9.30 वाजता आयोजित केले आहे, अशी माहिती दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त संजोग वाघेरे पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मोरवाडी, पिंपरी येथे झालेल्या पत्रकार परिषदेला प्रतिष्ठानचे विश्वस्त संजोग वाघेरे पाटील, सल्लागार अण्णा कापसे, सचिव बाळासाहेब वाघेरे, खजिनदार किसन वाघेरे, रमेश गोलांडे, बिपीन नाणेकर, अंकुश वाघेरे, जयवंत शिंदे यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्तेया वेळी उपस्थित होते.

संजोग वाघेरे पाटील यांनी सांगितले की, दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त विविध



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या पुतळ्यास सकाळी नऊ वाजता पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी 9.30 वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले जाईल. तसेच, पुरस्कार वितरण सोहळ्यात पिंपरी वाघेरे येथील ह.भ.प. दत्तात्रय कुदळे यांना पिंपरी-चिंचवड समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे.

यावेळी विधानसभेचे उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे, आमदार शंकर जगताप, महेश लांडगे, उमा खापरे, अमित गोरखे, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल, मंगला कदम, माजी नगरसेवक राहुल कलाटे, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, स्थायी समितीचे माजी सभापती अजित गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, पिंपरी चिंचवड शहर युवासेना प्रमुख चेतन पवार, माजी नगरसेवक डब्बू आसवानी तसेच, विविध पक्षांचे पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे संयोजन दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील प्रतिष्ठान व पिंपरी वाघेरे ग्रामस्थांनी केले आहे.

# पुण्यात एकतानगरीच्या संरक्षणासाठी ‘सीमाभिंत’

## पुणे महापालिकेची राज्य सरकारकडे 300 कोटी रुपये निधीची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात पाणी शिरलेल्या नरवीर तानाजी मालुसरे (सिंहगड) रस्त्यावरील एकतानगरी येथे पुन्हा पाणी घुसू नये, यासाठी येथील नदीकाठी सीमाभिंत बांधण्याचा विचार महापालिकेने सुरू केला आहे. ही सीमाभिंत बांधण्यासाठी राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे ३०० कोटी रुपये निधीची मागणी करण्यात आली आहे. सीमाभिंतीचा आता विचार होत असल्याने एकतानगरीच्या पुनर्वसनाचा प्रश्न मागे पडला आहे.




पावसाळ्यात धरणे भरल्यानंतर मोठ्या प्रमाणात नदीत विसर्ग सोडला जातो. याचा पहिला फटका सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी परिसराला बसतो. पूर्वी ग्रामपंचायतीच्या परवानगीने येथे इमारती उभारल्या आहेत. नदीत ३५ हजार क्युसेक पाणी आल्यानंतर निळ्या पूररेषेत असलेल्या एकतानगरीमध्ये पाणी शिरण्यास सुरुवात होते. गेल्या वर्षी झालेली अतिवृष्टी आणि मध्यरात्री अचानक धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी सोडल्याने एकता नगरीमधील नागरिकांचा जीव धोक्यात आला होता.

या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने एकता नगरीचे पूरापासून संरक्षण करण्यासाठी नदीकाठी सीमाभिंत बांधण्याचा पर्याय पुढे आणला आहे. महापालिकेने यापूर्वी कामगार पुतळा, मंगळवार पेठ झोपडपट्टी, पाटील इस्टेट झोपडपट्टी, विश्रांतवाडी येथील शांतीनगर झोपडपट्टी येथे नदीकाठी संरक्षक भिंती उभारून पुराचा धोका कमी केला आहे. या धर्तीवरच एकतानगरी येथे भिंत उभारण्यासाठी आराखडा तयार केला असून यासाठी ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

> “ एकतानगरी येथील पुराचा धोका कमी करण्यासाठी नदीकाठावर सीमाभिंत उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. यासाठी तीनशे कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यासाठी राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापनाला पत्र पाठविण्यात आले आहे.
>
> **- पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त महापालिका आयुक्त.**

# शहरातील रुग्णालयांचे फायर ऑडिट करणार

## पुणे महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त नवल किशोर राम यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

‘सर्वसामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेवून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे. शहरातील रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी शहरातील महापालिकेच्या रुग्णालयांसह खासगी रुग्णालयांचे फायर ऑडिट करण्याचे आदेश संबधित विभागांना दिले आहेत,’ अशी माहिती महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. महापालिकेच्या आयुक्तपदाची जबाबदारी घेतल्यानंतर नवल किशोर राम यांनी सोमवारी महापालिकेतील विविध खात्यांचा आढावा घेतला. या वेळी विभागप्रमुखांनी त्यांच्यासमोर सादरीकरण केले. पुढील दोन दिवस हा आढावा घेतला जाणार आहे.

महापालिका आयुक्त म्हणाले, ‘रुग्णालयांमध्ये आवश्यक ती खबरदारी घेतली जात नसल्याने आग लागणे, अपघात होण्याचे प्रकार घडतात. या पार्श्वभूमीवर खासगी रुग्णालयांनी आवश्यक नियमांचे पालन करून सुरक्षिततेच्या दृष्टिने त्याची पूर्तता केली आहे का? याची तपासणी होणे गरजेचे आहे. यासाठी शंभर टक्के फायर ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. ज्या रुग्णालयांमध्ये नियमांची पूर्तता होत नाही, हे समोर येईल, त्यांना टाळे ठोकण्याचा इशाराही देण्यात आला आहे.’



‘दैनंदिन कामात न अडकता शहराच्या आणि नागरिकांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण ठरतील, अशा योजना सुरू करण्यावर आपला भर राहणार आहे. केवळ महापालिकेतील अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या माहितीवर अवलंबून न राहता वेगवेगळ्या माध्यमांतून माहिती घेऊन नागरिकांच्या फायद्यासाठी उपक्रम राबविले जाणार आहेत. नागरिकांकडून तसेच विविध घटकांकडून माहिती घेत कामाचा प्राधान्यक्रम ठरविला जाणार आहे. प्रसंगी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देण्यावर भर राहील,’ असे त्यांनी सांगितले.

### ‘नदी सुधारणा, मेट्रो, जायका प्रकल्पांना प्राधान्य’

» ‘शहरात नदीसुधारणा योजनेचे काम गेले अनेक वर्षे सुरू आहे. ही शहरासाठी महत्त्वपूर्ण योजना असून, त्याचे काम संथ गतीने सुरू आहे. याबरोबर सक्षम सार्वजनिक वाहतुकीमध्ये मेट्रो प्रकल्पासह घनकचरा व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. या योजनांतून नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणार असल्याने या प्रकल्पांची कामे प्राधान्याने मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे,’ असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

# महापालिकेच्या जागांवर महामेट्रोचा डोळा

## जागा महापालिकेची उत्पन्न मात्र महामेट्रोला : भाडेतत्त्वावर दिलेल्या जागेचा मालकी हक्क मेट्रोकडे




**पिंपरी | प्रतिनिधी**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गालगत कोट्यवधी रुपये किंमत असणाऱ्या तब्बल २३ मोक्याच्या जागा पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून महामेट्रो प्रकल्पाकडे देण्यात येणार आहेत. त्यात दापोडी ते पिंपरी मार्गावरील ८, तर पिंपरी ते निगडी मार्गावरील १५ जागांचा समावेश आहे. त्यामुळे महापालिकेच्या जागेवर मेट्रोकडून व्यापारी संकुल उभारून दरमहा कोट्यवधींचे भाडे गोळा करत उत्पन्न मिळवले जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील दापोडी ते पिंपरीच्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या आठ जागा यापूर्वी ३० वर्षे भाडेतत्त्वावर महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (महामेट्रो) दिल्या. त्या कोट्यवधी रुपये किमतीच्या जागा महामेट्रोला बिनशर्त मालकी (फ्री होल्ड) हक्काने देण्याचे आदेश राज्य शासनाने महापालिकेला दिला आहे. त्यामुळे आठ जागेचा मालकी हक्क आता महामेट्रो असणार आहे.

पहिल्या टप्प्यात पिंपरी ते दापोडी अशी मेट्रो धावत आहे. या मेट्रो मार्गिकेसाठी महापालिकेने आठ जागा महामेट्रोला ३० वर्षांच्या भाडे तत्त्वावर दिल्या आहेत. त्या ठिकाणी पार्किंग विकसित करण्याची, व्यावसायिक उपयोग न करण्याची अट महापालिकेने घातली होती. तीस वर्षांचे एकूण भाडे रक्कम महापालिकेचा हिस्सा म्हणून महामेट्रोकडे समायोजित करण्यात येणार होते. त्यानुसार महापालिकेच्या वतीने दापोडी ते पिंपरी या मेट्रोच्या मार्गाकरिता मौजे पिंपरी येथील ३ जागा, वल्लभनगर येथील २ जागा, फुगेवाडी येथील २ जागा आणि दापोडी येथील १ जागा अशा एकूण ८ जागांचा आगाऊ ताबा महानगरपालिका सभेच्या मंजूर ठरावानुसार अटी व शर्तीवर ३० वर्षे कालावधीसाठी महामेट्रोला २०१८ साली देण्यात आलेला आहे.

महामेट्रोने प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेतले आहे. कर्जाची नियमित परतफेड, तसेच मेट्रो संचलन, दुरुस्ती व देखभालीचा खर्च भागवण्यासाठी महापालिकेच्या त्या जागांचा व्यावसायिक कारणांसाठी वापर होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्या जागा महामेट्रोला बिनशर्त मालकी हक्काने मिळाव्यात, अशी विनंती महामेट्रोने राज्य शासनाकडे केली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५० अ अन्वये राज्य शासनास प्राप्त अधिकारानुसार महापालिकेने त्या आठ जागा बिनशर्त मालकी हक्काने महामेट्रोला देण्यास नुकतीच मान्यता दिली आहे. त्या जागेच्या अधिमूल्याची रक्कम या प्रकल्पाच्या वित्तीय सहभाग आराखड्यानुसार महापालिकेने द्यावयाच्या वित्तीय सहभागामध्ये समायोजित केली जाणार आहे. या निर्णयानुसार महापालिकेने महामेट्रोला त्या आठ जागा बिनशर्त मालकी हक्काने देण्याबाबत तत्काळ कार्यवाही करावी. त्या जागा महामेट्रोने व्यावसायिक हेतूनेच वापराव्यात. जागेचा वापर न केल्यास त्या पुन्हा महापालिकेस बिनशर्त परत करण्यात याव्यात, असे राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या आदेशात नमूद केले आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या आठ जागांची मालकी आता महामेट्रोकडे असणार आहे.

### जागा त्वरित हस्तांतर होणार

» महापालिका ते निगडी या मेट्रो मार्गिकेच्या अनुषंगाने महापालिका हद्दीतील एकूण १५ जागा महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना हस्तांतरण करण्याची कार्यवाही महापालिका स्तरावर सुरू आहे. तसेच, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना जागा उपलब्ध करून देणेच्या संदर्भात दोन्ही संस्थेमधील जागा हस्तांतरणाची प्रक्रिया सुरळीतरीत्या सुरू असून, या मेट्रोमार्गात कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही. महामेट्रोची स्थिरता व वित्तीय व्यवहार्यता तसेच तिकिटोत्तर उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक जमिनीचा वाणिज्यिक वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेच्या हद्दीत असलेल्या या जमिनी मालकी हक्काने व बिन शर्तीने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन देण्यास शासनाने आदेशाद्वारे महापालिकेला कळवले आहे.

# टेक्निकल एररचा 'स्मार्ट सारथी' ॲपला अडसर

## डेक्कन क्वीन या रेल्वेचा 96 वा वाढदिवस रविवारी मोठ्या थाटामाटात साजरा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून स्मार्ट सारथी ॲपमध्ये नागरिकांना तक्रारी नोंदवताना अनेक समस्या, तांत्रिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. एआय आधारित नव्या 'स्मार्ट सारथी' ॲपवर तक्रार नोंदवली जात नसून, अनेक तांत्रिक समस्या जाणवू लागल्या आहे. याबाबत महापालिका आयुक्तांनी तत्काळ लक्ष घालण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते गणेश बोरा यांनी तक्रार दिली आहे. त्यात तक्रारीत म्हटले की, पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत विकसित करण्यात आलेल्या 'स्मार्ट सारथी' ॲपमध्ये अलीकडेच करण्यात आलेल्या एआय आधारित नव्या अद्ययावत व्हर्जनमुळे नागरिकांना तक्रार नोंदवताना गंभीर अडचणी येत आहेत. शहरातील विविध समस्या, प्रश्न, अडी-अडचणी यासह वेगवेगळ्या प्रश्नावर नागरिक महापालिकेच्या सारथी पोर्टलवर तक्रारी करत असतात. यामध्ये कचऱ्याच ढीग साचला, रस्त्यात खड्डा पडला, पाणी वेळेवर येईना, ड्रेनेज ओव्हरफ्लो होऊन दुर्गंधी सुटली यासह दैनंदिन अडचणी, समस्या अशा वेगवेगळ्या तक्रारी महापालिकेच्या सारथी हेल्पलाईनवर नागरिक करत आहेत.

**स्मार्ट सारथीबाबतच्या या प्रमुख समस्या**

ॲपमधील एआय अनेकदा चुकीचे किंवा संबंधित नसलेले तक्रारीचे पर्याय सुचवतो, किंवा काही वेळा आवश्यक पर्याय दिसतच नाहीत. त्यामुळे नागरिक अचूक तक्रार नोंदवू शकत नाहीत. तक्रार पुढे नेण्यासाठी गुगल मॅपवर पत्ता दिसणे अनिवार्य आहे. पण अनेकवेळा अचूक पत्ता न मिळाल्यास संपूर्ण प्रक्रिया थांबते. स्मार्ट सारथी हेल्पलाइनशी संपर्क केल्यावर अडचण मान्य करून 'फोनवरून तक्रार करा' असा सल्ला दिला जातो. पण, ही तात्पुरती आणि अपुरी व्यवस्था आहे.

### यंत्रणा हायटेक, अधिकारी उदासीन

» शहरातील ज्येष्ठ नागरिक, महिला यासह सर्वसामान्य नागरिकांना प्रत्येक वेळी त्यांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी मुख्य प्रशासकीय इमारतीत जाणे शक्य होत नाही. तसेच, क्षेत्रीय कार्यालयात हेलपाटे मारणेही अशक्य नसते. अशा वेळी त्यांना सारथीसारख्या सुविधेची अत्यंत आवश्यकता भासते. महापालिकेने लोकाभिमुख प्रशासन अंतर्गत अनेक घोषणा केल्या. नागरिकांना घरबसल्या आपल्या तक्रारींचे निराकरण करता येईल. अशी घोषणा केली. तक्रार नोंदवण्याची यंत्रणा हायटेक असली, तरी तक्रारींचे निराकरण करण्याबाबत अधिकाऱ्यानाच उदासीनता दिसून येत आहे. दरम्यान, सध्याच्या स्मार्ट सारथी ॲपची तांत्रिक अडचण लवकरात लवकर सोडवावी. भविष्यात ॲप अपडेट्स नागरिकांवर प्रभाव न टाकता सादर करावेत. स्मार्ट सिटीचा खरा उद्देश नागरिकांना सोयीसाठी तंत्रज्ञान देणे आवश्यक असताना अडथळा निर्माण होऊ लागला आहे. त्यामुळे स्मार्ट सारथीच्या तांत्रिक अडचणीचा निपटारा लवकर करावा, अशी मागणी बोरा यांनी केली आहे.

# पुणे महानगर क्षेत्रातील प्रस्तावित रस्त्यांना गती

## 150 रस्त्यांसाठी जमीन संपादनाची प्रक्रिया पीएमआरडीए कडून सुरू




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकसित करण्याबरोबरच वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने प्रस्तावित १५० रस्त्यांसाठी जमीन संपादनाची प्रक्रिया पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) सुरू करण्यात आली आहे. तसेच, ८५ हेक्टर क्षेत्रावरील आरक्षित भूखंडासाठी भूसंपादन करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील मावळ, हवेली, मुळशी आणि शिरूरसह अनेक प्रमुख तालुक्यातील रस्त्यांचा यामध्ये समावेश असून, पुणे महानगर क्षेत्राच्या ६ हजार २४६.२६ चौरस किलोमीटर क्षेत्रफळात नियोजित शहरी विकास करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

पुणे महानगर क्षेत्रातील शहरी भागांचा झपाट्याने विस्तार होत आहे. यातील बहुतांश भागात वाहतूक कोंडीची समस्या जाणवत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याची मागणी सातत्याने नागरिकांकडून होत होती. त्यादृष्टीने भूसंपादन करण्याची प्रक्रिया २८ मे पासून पीएमआरडीएने सुरू केली आहे. त्यासाठी एका सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यासाठीची निविदाही काढण्यात आली असून, या कंपनीकडून पायाभूत सुविधांचा विकास, आरक्षणांसह भूसंपादन केले जाईल.

सल्लागार संस्थेकडून भूसंपादन, पुनर्वसन, जमिनींचे अनिवार्य संपादन, थेट खरेदी आणि कायदेशीर बाबींची पूर्तता केली जाणार आहे. तसेच जमीन अधिग्रहण प्रस्ताव तयार करणे, संरचना, झाडे आणि विहिरींसारख्या बाधित मालमत्तेच्या नुकसानभरपाईचा अंदाज निश्चित करणे, संयुक्त मोजणी सर्वेक्षणावेळी मदत करणे, अशी कामे सल्लागार कंपनीकडून केली जाणार आहेत. तीस महिन्यांच्या कालावधीत ही सर्व कामे पूर्ण होणे अपेक्षित असून सल्लागाराची अंतिम नियुक्ती झाल्यांतर पंधरा दिवसांमध्ये कामे सुरू करता येणार आहेत.

दरम्यान, रस्त्यांच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यता आली असून, भविष्यातील पायाभूत सिविधांसाठी जमीन आरक्षित करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रकल्प वेळेत पूर्ण करता येणे शक्य आहे, असे पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी सांगितले.

# पीएमपीतील ठेकेदारी कारभाराबाबत प्रश्नचिन्ह

## पुणे महानगर परिवहन महामंडळाला गेल्या 10 वर्षांत तीन हजार 863 कोटी रुपयांची संचलन तूट

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाला (पीएमपीएमएल) गेल्या दहा वर्षांत तीन हजार ८६३ कोटी रुपयांची संचलन तूट निर्माण झाली आहे. पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही तूट भरून काढली जात असताना ‘पीएमपी’ने स्व-मालकीच्या बस कमी करून ७५ टक्के ठेकेदारांकडून बस सेवेत घेतल्या आहेत. ठेकेदारांचेच चालक आणि वाहक नेमले आहे. या कारभाराविरोधात पुणे महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा आपला परिसर संस्थेचे उज्वल केसकर यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणारी पीएमपी तोट्यात आहे. गेल्या दहा वर्षांत ३,८६३.१ कोटी रुपयांनी तोट्यात आहे. संचलन तूट भरून काढण्यासाठी पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांकडून निधी दिला जातो, तरी चालू वर्षात ७०६ कोटी रुपयांची संचलन तूट कायम असून पीएमपीकडून मात्र कंत्राटदारांच्या भरवशावर कारभार सुरु ठेवला आहे. दोन हजार बसपैकी संचलनात ७० टक्केच बस मार्गांवर धावत आहेत. उर्वरित बस देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली आगारातच आहेत. याचा फटका सामान्य प्रवाशांना बसत आहे. प्रवाशी तासंतास रस्त्यावर प्रतीक्षेत उभे राहत आहेत, याबाबत कुठले नियोजन, व्यवस्था करण्यात आली आहे. सेवेतील त्रुटी दूर करण्यासाठी कुठलेच नियोजन केले आहे, असे अनेक प्रश्न उपस्थित करत तातडीने बैठक घ्यावी, असे मागणीपत्र पीएमपीच्या व्यवस्थापकीय संचालक मंडळाला पाठवले आहे.




### कंत्राटी बसबाबत काय नियोजन ?

» सध्या पीएमपीच्या ८०० बस स्वत:च्या असून एक हजार १०० बस कंत्राटी तत्त्वावर ठेकेदारांकडून संचनात कार्यरत आहेत. यामध्ये इलेक्ट्रिक बससाठी प्रति किलोमीटर ५८ रुपये दर असून यामध्ये ठेकेदार आणि वाहक यांचा समावेश असताना नव्याने ४०० बस सेवेत घेणार असल्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ८४ किलोमीटर दर निश्चित करण्यात आला असून चालक आणि वाहकही ठेकेदारांचेच असल्याने प्रत्येक फेरीमागे मिळालेले सर्व उत्पन्न पीएमपीला मिळेल यावर नियंत्रण राहणार का, कोणती व्यवस्था असणार असे अनेक प्रश्न उपस्थित करून चर्चेची मागणी केली आहे.